

महाराष्ट्र MAHARASHTRA

भागीदारी

M 126700

Noted & Registered
at Serial Number
1592/2012
17/12/2012

स्टॅम्प रुपये- 500 /-

श्री गणेशाय नमः /श्री साई समर्थ

भागीदारी पत्र

सदर भागीदारी पत्र आज दि.14 माहे डिसेंबर इसवीसन 2012 शुक्रवार ते दिवशी नाशिक मुक्कामी..

NOTARY RAMESH FAKIRRAO KUYATE NASIK DIST. AREA REGD. NO. 2127 NOTARIAL GOVT. OF INDIA

NOTARY RAMESH FAKIRRAO KUYATE NASIK DIST. AREA REGD. NO. 2127 NOTARIAL GOVT. OF INDIA

ADVOCATE & NOTARY

NOTARY
RAMESH
FAKIRRAO KUVATE
NASIK DIST. AREA
REGD. NO. 2127
GOVT. OF INDIA

१) श्री. राजाराम गोपाळा मटाले
उ.व-४६, धंदा- व्यापार व शेती
रा. कामटवाडे ता.जि. नाशिक

भागीदार नं. १

२) श्री. शांताराम दादा मटाले
उ.व-४४, धंदा- व्यापार व शेती
रा.कामटवाडे ता.जि. नाशिक

भागीदार नं. २

३) श्री. रविंद्र सुखदेव मटाले
उ.व-३३, धंदा- व्यापार
रा.कामटवाडे ता.जि. नाशिक

भागीदार नं. ३

कारणे भागीदार सदरचे भागीदारी पत्र लिहुन ठेवतात ते खालील प्रमाणे :-

येणेप्रमाणे वर उपरोक्त भागीदारांनी दि ३ / १२ /२०१२ पासुन " त्रिमुर्ती ग्रुप भागीदारी संस्था " या नावाने भागीदारी व्यवसाय करावयाचे ठरविलेले आहे.

सदर भागीदारी व्यवसायात शेती, प्लॉटस् खरेदी विक्री, विकसन, कन्स्ट्रक्शन व बांधीव जागेची खरेदी विक्रीचा , दलालीचा व तत्संबधीत सर्व प्रकारचा व्यवसाय करावयाचे सर्व भागीदारामध्ये ठरविले आहे.

उपरोक्त भागीदारांनी सदर भागीदारी व्यवसाय खालील अटी व शर्तीवर करण्याचे ठरविले आहे. तथापि सदरच्या इच्छेमुळे त्यानी खालील अटी व शर्तीवर भागीदारी संस्था प्रस्थापित करण्याचे ठरविले.

१) **भागीदारी व्यवसायाची सुरुवात व कालावधी** :- सदर भागीदारी व्यवसायाची सुरुवात ३. डिसेंबर २०१२ रोजी झाली असे समजण्यात येईल.

२) **भागीदारी संस्थेचा व्यवसायाचा पत्ता** :- सर्वे नं.गोपालकृष्ण नगर, मटाले मळा, हि.जी.पी नगर, २ समोर, कामटवाडे, नाशिक .पिन नं. ४२२०१० येथे अगर सर्व भागीदार सदर व्यवसायाचे ठिकाणात सर्वसंमतीने वेळोवेळी बदल करु शकतात.

३) सदर भागीदारी संस्थेचा व्यवसाय **" त्रिमुर्ती ग्रुप भागीदारी संस्था "** या नावाने व शैलीने असले. तथापि भागीदार आपआपसांत ठरवतील त्याप्रमाणे सदरील नावात बदल करु शकतील.

४) **सदर भागीदारी संस्थेच्या व्यवसायाचे स्वरुप** :- सदर भागीदारी व्यवसायात शेती, प्लॉटस् , खरेदी विक्री, विकसन, कन्स्ट्रक्शन व बांधीव जागेच्या खरेदी विक्रीचा , दलालीचा तसेच तत्संबधीत सर्व प्रकारचा व्यवसाय करावयाचे सर्व भागीदारांमध्ये ठरले आहे .तसेच सर्व भागीदारांच्या सहसंमतीने व्यवसायाच्या स्वरुपात बदल करता येतील.

५) भागीदारी व्यवसायचा कालावधी हा **मर्जी नुसार** असेल

६) सदर भागीदारी व्यवसायाचे सुरुवातीचे भांडवल रुपये ९०,००० /-(अक्षरी रक्कम रुपये नव्वद हजार मात्र) सदरचे भांडवलाची गुंतवणुक भागीदार नं. १ ते ३ यांनी प्रत्येकी रक्कम रुपये ३०,००० /- म्हणजेच निम्मे निम्मे करावयाची आहे.

७) सदर भागीदारी व्यवसायाला काही भांडवलाची आवश्यकता पडल्यास भांडवल सर्व भागीदारांच्या

ADVOCATE & NOTARY

NOTARY
RAMESH
FAKIRRAO KUYATE
NASIK DIST. AREA
REGD. NO. 2127
OF INDIA

संमतीने व सर्व भागीदारांच्या संयुक्त सह्यांनी उभे केले जाऊ शकेल. सदर उभे केलेले भांडवल हे भागीदारी संस्थेचे कर्ज असेल.सदर कर्जावर देण्यात येणाया व्याजाचा हिशोब नफा तोट्याच्या खात्यात गृहीत धरण्यात येईल. व तो भागीदारी संस्थेचा खर्च असेल. त्याचप्रमाणे अधीक भांडवलाची आवश्यकता पडल्यास वित्तीय संस्थेचे/ बँकेचे कर्ज घेता येईल.

८) सदर भागीदारी संस्थेचे बँक खाते सर्व भागीदारांच्या संमतीने कुठल्याही नॅशनलाईज्ड अथवा को-ऑपरेटीव्ह बँकेत उघडण्यात येईल.तसेच सदरचे बँक खाते हे सर्व भागीदारांच्या अथवा दोघांच्या सहीने चालविले जाईल. सदरच्या खात्यातुन काढावयाच्या सर्व रक्कमा ह्या रोख अथवा चेक व डिमांड ड्राफने काढावयाच्या आहेत. भागीदारी संस्थेस मिळणारी सर्व रक्कम देखिल सदर खात्यात जमा करावयाची आहे.

भागीदारी संस्थेच्या व्यवसायासाठी विविध लायसेन्स, परवानग्या काढणे आवश्यक राहातील, त्याकामी लागणारे अर्ज, अफेडेव्हिट हे उपरोक्त भागीदार नं. १ ते ३ पैकी कोणीही एका भागीदाराचे सहीने करावयाचे आहेत. त्याचप्रमाणे सदर व्यवसायाकामी लागणाया मिळकतींचे खरेदी अथवा विक्री सर्व भागीदारां पैकी कोणाही एका भागीदाराचे सहीने अथवा सर्वांचा ज.मु / वि.मु म्हणुन सर्वां पैकी एकाची नेमनुक करावयाची आहे.

९) भागीदारीच्या भांडवल खात्यावर किंवा इतर खात्यांवर १२% दराने सरळ व्याज देण्यात येईल.(सदर व्याज हे भारतीय आयकर कायदा कलम ४०ब(४) यास आधिन राहून असेल)

१०) भागीदार नं. १ ते ३ सदर भागीदार संस्थेचे सक्रीय सभासद असतील व त्यासाठी त्यांना योग्य तो मोबदला देण्यात येईल. सदर मोबदला वर्षाच्या शेवटी पुस्तकी नफा काढल्यानंतर देण्यात येईल. सदर भागीदारी व्यवसायाचा नफा भारतीय आयकर कायदा १९६१ च्या तरतूदी नुसार काढण्यात येईल. सदर मोबदला नफा वाटपाच्या भागाप्रमाणे वाटप करण्यात येईल.

११) **हिशोब** -: सदर भागीदारी नफ्या किंवा तोट्यातुन सर्व खर्च, चार्जेस वजा जाता निघालेला निव्वळ नफा खालील प्रमाणात वाटप करण्यात येईल.

तपशिल	देय असणारा नफ्या/तोट्यातील हिस्सा
भागीदार नं.१	३३.३३ %
भागीदार नं.२	३३.३३
भागीदार नं.३	३३.३३ %
एकुण	१००%

१२) **हिशोबाची पुस्तके** -: सदर भागीदारी संस्था हिशोबाचे पूस्तके सांभाळतील. तसेच भागीदारी संस्थेच्या सर्व व्यवहारांच्या त्यात व्यवस्थीत हिशोब केलेला असेल. तसेच ती पुस्तके भागीदारी व्यवसायच्या मुख्य ठिकाणी ठेवलेली असतील.सर्व भागीदारांना ती तपासण्याचा अधिकार असेल. तसेच सर्व भागीदारांना त्यांच्या नकला काढण्याचा अधिकार असेल.सदर हिशोबाच्या पुस्तकांचा हिशोब ३१ मार्च रोजी काढण्यात येईल. तसेच सदर भागीदारी संस्था नफा तोटा काढण्यासाठी सर्व गरजेनूसार खाती तयार केली जातील.संस्थेत होणारे आव व जावक हिशोब योग्य पध्दतीने ठेवण्यात येईल.

१३) भागीदारी संस्थेतुन भागीदाराच्या वैयक्तिक खर्चासाठी काढावयाच्या असलेल्या रकमेबाबत सर्व भागीदारींच्या संमतीने निर्णय घेण्यात येईल.

१४) सदर भागीदारी संस्थेच्या नियोजनाचे, देवाण-घेवाण व्यवहाराचे अधिकार सर्व भागीदारांना देण्यात आलेले आहेत.त्याचप्रमाणे भागीदारी संस्थेच्या नावाने स्थावर मालमत्ता विकत घेण्याचा अधिकार सर्व भागीदारांना राहील.

ADVOCATE & NOTARY

NOTARY
RAMESH
FAKIRRAO KUYATE
NASIK DIST. AREA
REGD. NO. 2127.
GOVT. OF INDIA

१५) **सामन्यवाढी -:**

अ) प्रत्येक भागीदार प्रामाणीक पणे व होतकरुपणे भागीदारी संस्थेच्या जास्तीतजास्त उपयोगासाठी व हक्कासाठी काम करेल.

ब) प्रत्येक भागीदार दुसऱ्या भागीदारासोबत प्रामाणिक पणे व व्यवहारीकपणे दूसऱ्या भागीदारासोबत आचरण करेल.

क) प्रत्येक भागीदारानी काढलेल्या व्यक्तीशः व खाजगी कर्जाची परतफेड वेळोवेळी केली पाहीजे. जर त्या कर्जामुळे भागीदारी संस्थेत काही नुकसान झाल्यास त्याची भरपाई सदर भागीदारस करावी लागेल.

१६) कुठल्याही भागीदारास दुसऱ्या भागीदाराच्या लेखी संमतीशिवाय खालील गोष्टी करणार नाही.

- अ) कुठल्याही इसमास सदर भागीदारी संस्थेचा भागीदार म्हणुन ओळख.
- ब) सदर भागीदारी संस्थेस असलेल्या भागीदाराच्या हिश्याचे हस्तांतरण तारण किंवा त्यावर कुठलाही बोजा किंवा त्याची विल्हेवाट.
- क) कुठल्याही भागीदारी संस्थेच्या नावाने कर्ज काढणे, हातउसणवारी करणे.
- ड) भागीदारी संस्थेच्या नियमीत व्यवहाराव्यतरीक्त उसणेपैसे घेणे, व उसणेपैसे देणे.
- इ) भागीदारी संस्थेच्यावतीने भागीदारी संस्थेच्या कर्जा बाबत कर्ज माफ करणे, व त्यात सूट करणे.
- फ) कुणालाही जामीनदार होणे की ज्यामुळे भागीदारी संस्थेच्या अस्तित्वास धोका निर्माण होईल.
- ग) प्रत्येक भागीदाराचा भागीदारी संस्थेत असलेला समभाग, तारण, हस्तांतरण, व बोजा.

१७) कोणीही भागीदाराने भागीदारी संस्थेच्या नावाचा आधार घेवुन व्यवसायाव्यतरीक्त काही आर्थिक व्यवहार केल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी भागीदारांची वैयक्तीक राहील. त्यास भागीदारी संस्था जबाबदार राहणार नाही.

१८) यदाकदाचित कुठल्याही भागीदाराला भागीदारी व्यवसायातुन निवृत्त व्हायचे असेल तर उर्वरीत भागीदारांना १ महीना आगोदर लेखी नोटीस देणे बंधनकारक असेल. कुठल्याही निवृत्त भागीदाराला सदर भागीदारी संस्थेची पत मागण्याचा अधिकार असणार नाही. जर भागीदाराच्या निवृत्ती नंतर उर्वरीत भागीदार ह्याच भागीदारी संस्थेच्या नावाने व शैलीने नविन भागीदारास भागीदार बनवुन सदर व्यवसाय पुढे चालवु शकतील.

१९) कोणत्याही भागीदाराने केलेल्या गैरकृत्यामुळे जर सदर भागीदारी संस्थेच्या अस्तित्वास धोका निर्माण होत असल्यास किंवा वरील मुद्दा क्र.१६ प्रमाणे भागीदाराने गैरव्यवहार केल्यास उर्वरीत भागीदारांकडे सहसंमतीने त्या भागीदारास भागीदारीतून काढून टाकण्याचे पुर्ण अधिकार असतील.

२०) कुठल्याही भागीदाराचा मृत्यु झाल्यास त्यांचे कायदेशिर वारसांना सदर भागीदारी व्यावसायात सामावुन घेतले जाईल, त्यांस सदर भागीदारी व्यवसायाचा भागीदार समजण्यात येईल. त्याच प्रमाणे निवृत्ती, दिवाळखोरी ही भागीदारी व्यवसायच्या विसर्जनास कारणीभुत ठरणार नाही. इतर शिल्लक

राहीलेले भागीदार व भागीदारी व्यवसायात व्यवसाय करणारे भागीदार नविन भागीदारास व्यवसायात सामावुन घेऊन किंवा त्याशिवाय भागीदारी व्यवसाय चालु /सुरु ठेवु शकतील.

२१) उपरोक्त उल्लेख केलेल्या अटी व शर्तींमध्ये बदल करण्याचा अधिकार सर्वही भागीदारांना असेल.

ADVOCATE & NOTARY

THIS DOCUMENT
CONTAINS ... 05 ..... PAGES

NOTARY
RAMESH
FAKIRRAO KUYATE
NASIK DIST. AREA
REGD. NO. 2127
GOVT. OF INDIA

२२) सदर भागीदारी संस्थेत कुठल्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास कुठलाही भागीदार सदर वाद कोर्टात नेणार नाही. तो भारतीय लवाद कायदा १०४० नूसार लवादाची नियुक्ती करुन सदर वाद लवादाद्वारे मिटवण्यात येईल.

वरील भागीदारी पत्रावर सर्व भागीदारांनी आपआपल्या सहया या भागीदारी पत्रावर लिहील्याप्रमाणे केल्या आहेत.

नाशिक.दिनांक.१४ / १२/२०१२



१) श्री. राजाराम गोपाळा मटाले
(भागीदार नं.१)



२) श्री. शांताराम दादा मटाले
(भागीदार नं.२)



३) श्री. रविंद्र सुखदेव मटाले
(भागीदार नं.३)

साक्षीदार :- ① S.P.Patil
② G.N. Ingle

IDENTIFIED BY
I identify the above Parties
Adv S. S Sangle

NOTARY
RAMESH
FAKIRRAO KUYATE
NASIK DIST. AREA
REGD. NO. 2127
GOVT. OF INDIA

BEFORE ME
17/12/12
R. F. KUYATE
NOTARY, GOVT. OF INDIA
ADVOCATE & NOTARY
Chamber No. 326,Maruti Chambers,
District Court, Nashik - 2.

Noted & Registered 1592/2012
at Serial Number
17/12/2012